**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - सुबोध मनोहरराव गजभिये

**वय** - २९ वर्ष, **व्यवसाय –** नोकरी

**पत्ता** - बडेगाव, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांच्यामार्फत.**

दि. २७.०१.२०१९ रोजी पोलिसांनी आम्हाला ग्रामपंचायतला बोलावले होते. मला समंस दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. ते **निशाणी क्र.१६** कडे आहे. ग्रामपंचायत येथे आमच्या सह्या घेतल्या. माझ्या सोबत तुषार बागडे, पोलिस व सरपंच होते. मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मी वाचला नव्हता. सहीला **निशाणी क्र.१९** देण्यात येते.

**(साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, दि. २६.०१.२०१९ रोजी आरोपी यांनी ग्रामसभेमध्ये सरपंच यांना अश्लील शब्दात शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे आहे की, दि. २७.०१.२०१९ रोजी पोलिसांनी मला व तुषार बागडे यांना पंच म्हणून सुचनापत्र दिले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आमच्या समक्ष घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, इमारती विटा सिमेंटनी बांधलेले व उत्तरेकडे तोंड असलेली इमारत आहे व त्याला लोखंडी गेट आहे. हे म्हणणे खरे आहे की, २०० फुट रूंदीचा हॉल होता, तिथे टेबल खुर्च्या व संगणक कागदपत्र होती, तसेच लोखंडी आलमारी व प्लॉयवूडचे पारटिशन होते. हे म्हणणे

खरे नाही की, माझ्या समक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्याकरिता मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि. एन. काळे यांचेमार्फत**

**आरोपी हजर. आरोपींतर्फे वकील गैरहजर. आरोपींनी अर्ज दिला त्यावरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.05.21 12:45:34 +0530

सावनेर,

(एस. एम. गाडे)

दिनांक २१.०५.२०२५

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

(न्यायालय क्र.०३) सावनेर

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe